# पोलीस आयुक्त, अमरावती शहर

## पोलीस शिपाई भरती २०२२-२३

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी केलेल्या आणि दिनांक २३/०६/२०२२ च्या सेवाप्रवेश नियमात केलेल्या सुधारीत तरतुदीनुसार पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई यांची ७४ रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीद्वारे **दिनांक ५.३.२०२४ ते ३१.३.२०२४ या कालावधीत** स्विकारण्यात येतील. या बाबतची सविस्तर माहिती policerecruitment2024.mahait.org **आणि** www.mahapolice.gov.in या संकेतस्थळांवर उमेदवारांच्या माहितीकरीता प्रसिध्द करण्यात आली आहे.

- उमेदवारास पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांच्या आस्थापनेवरील पोलीस शिपाई या पदासाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर उपलब्ध राहणार आहे.
- उमेदवार एका पदाकरीता संपुर्ण महाराष्ट्र राज्यात फक्त एका घटकात अर्ज करु शकतो.
- उमेदवाराने चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्य होईल.
- पोलीस शिपाई या पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवाराची प्रथम ५० गुणांची शारिरीक चाचणी परीक्षा घेण्यांत येईल व त्यानंतर होणारी लेखी परीक्षा ही **सर्व पोलीस घटकामध्ये लेखी परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेवूनच आवेदन अर्ज भरावा.**
- **भरती प्रक्रियेमध्ये प्रथम शारिरीक चाचणी घेण्यात येणार आहे. शारिरीक योग्यता चाचणीमध्ये किमान ५० टक्के गुण मिळविणारे उमेदवारामधुन संबधीत प्रवर्गामधील जाहिरात दिलेल्या रिक्त पदाच्या १:१० प्रमाणात उमेदवारांची १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. उमेदवारांना लेखी परीक्षेमध्ये किमान ४० टक्के गुण मिळविणे अनिवार्य आहे. लेखी परीक्षेमध्ये ४० टक्केपेक्षा कमी गुण असलेले उमेदवार अपात्र समजण्यात येतील.**
- **सर्व पोलीस घटकांमध्ये लेखी परीक्षा एकाच दिवशी आयोजित करण्यात येईल. त्यासाठी अर्जदाराने ऑनलाईन आवेदन अर्ज भरतेवेळी सदरची बाब विचारात घेवुनच आवेदन अर्ज भरावा.**
- **शारिरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये नमुद केलेल्या दोन निकषांच्या निकालाच्या आधारे उमेदवारांमधुन एक गुणवत्तायादी तयार केली जाईल.** तात्पुरत्या निवडसुचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवाराचीच मुळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसुचीमध्ये समावेश केला जाईल. निवडसुचीतील उमेदवाराची निवड तात्पुरती (Provisional Selection) असेल. **शारिरीक चाचणी व लेखी चाचणी यामध्ये मिळालेल्या गुणांचे एकत्रिकरण केल्यानंतर, गृहविभाग शासन निर्णय, दि.१०.१२.२०२० नुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.**
- पोलीस शिपाई पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक आर्हता, शारिरीक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे/कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतची माहिती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारासाठी सविस्तर सुचना policerecruitment2024.mahait.org या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. **सदरहू जाहिरात उमेदवारांनी काळजीपुर्वक वाचुन, समजुन घ्यावी. तसेच, सामाजिक, समांतर आरक्षण व अनाथांकरीता उपलब्ध पदांच्या १% आरक्षित जागा विचारात घेउन रिक्त पदांबाबतची खातरजमा करावी व त्यानंतरच उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.**
- **भरती प्रक्रीये दरम्यान शारिरीक चाचणी व लेखी चाचणीमध्ये निश्चित केलेल्या दिनांकास उमेदवार गैरहजर राहील्यास, त्यास भरती प्रक्रीयेतुन बाद ठरविण्यात येईल. कार्यालयाने एकदा निश्चित केलेल्या दिनांकामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल करण्यात येणार नाही.**

Scanned with OKEN Scanner

- उमेदवारांनी संकेतस्थळावर जावुन आवदेन अर्ज सादर करावयाचा आहे, त्या घटकात रिक्त असलेली पदे विचारात घेऊनच उमेदवाराने अर्ज सादर करावेत. मागासवर्गीय उमेदवार खुल्या प्रवर्गात (Unreserved) अर्ज करु शकतात, परंतु खुल्या प्रवर्गातील (Unreserved) उमेदवार मागासवर्गीय प्रवर्गात अर्ज करु शकणार नाहीत.

- पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहुन व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन रिक्त पदाची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहीरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

**(नविनचंद्र रेड्डी)**
पोलीस आयुक्त, अमरावती शहर

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र राज्य पोलीस शिपाई भरती सन -२०२२-२३

पोलीस आयुक्त, अमरावती शहर

**जाहीरात क्रमांक :- प्रलि-आस्था/पोलीस भरती-२०२२-२३/पोशि/२०२२/2263** **अमरावती दिनांक :-** 29 FEB 2024 /०२/२०२४

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ व त्यानंतर शासनाने वेळोवेळी आणि दिनांक २३.०६.२०२२ च्या आदेशान्वये केलेल्या सुधारणांनुसार पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांच्या आस्थापनेवर सन २०२२-२३ मध्ये पोलीस शिपाई संवर्गात रिक्त होणारी ७४ पदे भरण्यासाठी पोलीस शिपाई पदाची भरती आयोजित करण्यात येत आहे.

**१) पोलीस शिपाई**

| | अ.जा. | अ.ज. | वि.जा.-अ | भ.ज.-ब | भ.ज.-क | भ.ज.-ड | विमाप्र | इमाव | एसईबीसी | इ-डब्लू-एस | अराखीव | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| एकुण | ९ | ५ | ३ | ३ | ३ | १ | १ | १४ | ७ | ७ | २१ | ७४ |
| कप्पीकृत आरक्षण ⬇ | | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | ५ | २ | २ | २ | २ | १ | १ | ४ | ४ | ४ | ६ | ३३ |
| महिला | ३ | २ | १ | १ | १ | - | - | ४ | २ | २ | ६ | २२ |
| खेळाडू | - | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ | ०२ |
| प्रकल्पग्रस्त | - | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ | ०२ |
| भुकंपग्रस्त | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | ०१ |
| माजी सैनिक | १ | १ | - | - | - | - | - | २ | १ | १ | ३ | ०९ |
| अंशकालीन पधवीधर | - | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ | ०२ |
| पोलीस पाल्य | - | - | - | - | - | - | - | - | - | - | १ | ०१ |
| गृहरक्षक दल | - | - | - | - | - | - | - | १ | - | - | १ | ०२ |
| अनाथ | | महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्रमांक अनाथ-२०२२/प्र.क्र.१२२/का-०३, दि.६.४.२०२३ मधील तरतुदीनुसार एकुण रिक्त पदांच्या १% इतकी पदे | | | | | | | | | | |

**महत्वाची टिप :-**

जिल्हा पोलीस शिपाई भरती करण्याबाबत कोणीही पैशाची किंवा अन्य कोणत्याही स्वरुपाची मागणी केल्यास संबधीत उमेदवाराने त्याबाबतची माहिती अॅन्टीकरप्शन ब्युरो, अमरावती यांना दुरध्वनी क्रमांक ०७२१- २५५३०५५, १०६४ (टोल फ्री) वर त्वरीत संपर्क साधून तक्रार करावी. तसेच, या संदर्भात उमेदवार पोलीस आयुक्त, अमरावती शहर या कार्यालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी किंवा अध्यक्ष, पोलीस भरती समिती-२०२२-२०२३ तथा पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांच्याशी संपर्क साधून तक्रार करू शकतील.

उमेदवारांना काही अडचणी आल्यास खालील दिलेल्या हेल्पलाईन नंबरवर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

| अ.क्र. | संस्था / कार्यालयाचे नांव | दुरध्वनी /मोबाईल क्रमांक |
|---|---|---|
| १. | पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर | दुरध्वनी क्र.०७२१-२५५१००१<br>०७२१-२५५१००० |

(नविनचंद्र रेड्डी)
पोलीस आयुक्त, अमरावती शहर

Scanned with OKEN Scanner